## रे.दि.मु.क्र.६३/२०२५ मधील नि.१८ खालील आदेश

(सुमन शिंदे वि. तुकाराम शिंदे)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीबाबत ''जैसे थे परिस्थिती'' ठेवणेबाबतचा आदेश पारित करणेकरिता दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनानुसार, त्यांनी प्रस्तुतचा दावा ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. त्याबाबचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.४ यांचे लाभात दिनांक २०.०३.२०२५ रोजी दावा मिळकतीचे बेकायदेशीर खरेदीपत्र करुन दिलेले आहे. सदर खरेदीपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.४ हे त्यांना मिळालेली बेकायदेशीर पाण्याची पाळी पुन्हा तिऱ्हाईत इसमांस तबदिल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यानुसार प्रतिवादी क्र.४ हे त्यांच्या हक्कात असलेल्या बेकायदेशीर खरेदीपत्राच्या आधारे वादीच्या मालकी कब्जेवहिवाटीत असलेल्या मिळकतीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे, वादी यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांना प्रस्तुत अर्जाच्या नोटिशीची बजावणी होवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविणेत येत आहे. .

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.४ यांच्या लाभात करुन दिलेले दिनांक २०.०३.२०२५ रोजीचे खरेदीपत्र वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळणेकरिता व निरंतर ताकीदीकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ यांना प्रस्तुत अर्जाची नोटीस मिळून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे, वादी यांची प्रस्तुत अर्जान्वये केलेली मागणी विचारात घेता, जर प्रतिवादी क्र.४ यांनी वाद मिळकतीची किंवा त्यातील पाण्याच्या पाळीची पुन्हा विक्री केली तर वादी यांच्या दाव्याचा हेतूच निष्फळ होवून कायदेशीर इलाजांचे बाहुल्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता, दोन्ही पक्षकारांना ''जैसे थे परिस्थिती'' ठेवणेबाबत आदेश पारित करणे इष्ट व उचित वाटते. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. वादी व प्रतिवादी क्र. ४ यांना याद्वारे आदेशीत करणेत येते की, त्यांनी दावा मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करु नये म्हणून ''जैसे थे परिस्थिती'' ठेवावी.

२. पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.02.28 16:42:16 +0530

दिनांकः-२५.०२.२०२६ (प्रकाश चु. बछले)

जत. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जत.

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R. B. Samalewale |
| Name of the Court | :- | Shri. Prakash C. Bachhale,<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Jath. |
| Date of decision | :- | 25.02.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 28.02.2026 |
| Order uploaded on | :- | 28.02.2026 |